Estd 1962 "A++"Accredited by NAAC(2021) WITH CGPA3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
**II Extension for Snack Spot No. 5 ( Nano Science & Technology Department)**

शिवाजी विद्यापीठ परिसरातील शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यासाठी विद्यापीठ परिसरातील स्नॅक स्पॉट क्र. ५ नॅनो सायन्स अधिविभाग हे लिव्ह अॅन्ड लायसेन्सी पध्द्तीने चालविण्यासाठी द्यावयाची आहेत. मोठया उद्योगधंद्यात,शैक्षणिक संस्थेत उपहारगृह चालविण्याचा अनुभव असणा-या व्यक्ती अगर संस्थाकडून दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक व दराची दरपत्रक) जाहीर दरपत्रके मागविण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहेत.

दरपत्रकाचा अर्ज विद्यापीठाच्या या www.unishivaji.ac.in संकेत स्थळावर other tenders या लिंकवर उपलब्ध होतील. सदर दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीने **दि.१३.१०.२०२५** रोजी पूर्वी कार्यालयात पोहचेल अश्‍रितीने पाठवावी. दरपत्रकाच्या लखोट्यावर स्पष्टपणे कोणत्या स्नॅकस्पॉटसाठी दरपत्रक भरलेली आहे ते नमूद करावे.

दरपत्रके मंजूर/नामंजूर करण्याचा अंतिम अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

शिवाजी.वि./भांडार/
दि. ६.१०.२०२५

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## <u>दरपत्रक अर्ज</u>

शिवाजी विद्यापीठ परिसरातील **स्नॅक स्पॉट क.5 (नॅनो सायन्स अधिविभाग)** चालविण्यास घेणा–या अर्जदाराने खालील बाबींचा उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक स्नॅक स्पॉटसाठी स्वतंत्र दरपत्रक अर्ज भरणे आवश्यक आहे.

1. दरपत्रक धारकांचे नाव व पत्ता :– ..............................................................................
   ( आयकर विवरणपत्राप्रमाणे) ..............................................................................
   ..............................................................................
2. दुरध्वनी कमांक :– ..............................................................................
3. बयाणा रक्कम ( परतावा ) :– दरपत्रके असल्याने बयाणा रक्कम भरण्याची आवश्यकता नाही
   इतकी रक्कम दरपत्रक फॉर्म सोबत भरण्याची आहे.
4. अर्जदाराचा सदर व्यवसाय यापूर्वी केलेबाबत एकूण अनुभव व त्याबाबतचे सदर संस्थेची कामाबाबतचे पत्र व सदर काम पुर्ण केलेबाबतचे कागदपत्र –
   ——————————————————————————
   ——————————————————————————————
   ——————————————————————
5. स्नॅक स्पॉट चालविण्याचा आजतागायत अनुभव असलेचा दाखला/दाखले सोबत जोडावेत.
6. आजतागायत चालवित असलेल्या कॅन्टीनची नावे व ठिकाणे इ.बाबत माहिती खालील तक्त्यात द्यावी.

| अ.न. | कॅन्टीनचे नाव व संस्था | विस्तृत पत्ता | कालावधी | फोन नं. |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. स्नॅक स्पॉट मधील कामासाठी पुरेसा प्रशिक्षित सेवक वर्गाची माहिती खालील कोष्टकात भरावी.

| अ. न. | कामाचे स्वरूप | संख्या | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | |
| 1. | मालवाला/स्वयंपाकी | | | |
| 2. | वेटर/ वाढपी | | | |
| 3. | स्वच्छता | | | |

8. स्नॅक स्पॉट मध्ये पुरवठा कराव्या लागणाऱ्या पदार्थांचे दरपत्रक सोबत जोडपत्र 'अ' येथे जोडले आहे. त्याप्रमाणे खाद्यपदार्थ पुरवठा करण्यास तयार आहात काय ?

होय/नाही

**अर्जदाराचे पुर्ण नांव, सही व शिक्का**

**खाद्यपदार्थाचा दर्जा चांगला आहे. त्यांचेच दरपत्रक मंजूर करण्यात येईल. याबाबतची नोंद घेण्यात यावी.**

09. विद्यापीठाच्या परिसरात समारंभाच्या ठिकाणी अथवा अन्य विभागात समारंभासाठी ऑर्डरप्रमाणे चहा, नाष्टाचे पदार्थ व भोजन पुरवू शकाल का?

होय / नाही

10. अर्ज मान्य झाल्यास विद्यापीठाने तयार केलेल्या करारप्रमाणे करार करुन देण्यास तयार आहात काय ?

होय / नाही

11. गत 3 वर्षातील आयकर विवरणपत्रे व ॲसेसमेंट ऑर्डरच्या झेरॉक्स प्रती सोबत जोडल्या आहेत. (ज्या नावाने दरपत्रक भरली आहे त्यानावाच्याच प्रती जोडाव्या अन्य जोडल्यास गृहीत धरल्या जाणार नाहीत.)

आहेत / नाहीत.

12. आपणास कोणत्याही अपराधबद्दल आतापर्यंत कधीही अटक / स्थानबद्ध करण्यात आले आहे काय? असल्यास त्याचा सविस्तर तपशिल द्यावा / जोडावा.

13. आपल्या विरुद्ध कोणत्याही न्यायालयात फौजदारी खटला सूरु आहे काय? असल्यास त्याचा तपशिल, प्रकरण क्र. कोणत्या न्यायालयात प्रकरण प्रलंबीत आहे, गुन्हा कोणत्या कलमाखाली नोंदविला आहे याबाबतचा सविस्तर तपशिल द्यावा / जोडावा. (सोबत पोलीस स्टेशनचा दाखला )

14. अर्जदाराने उपहारगृह / स्नॅकस्पॉट चालवणे करीता आवश्यक असलेले परवान्याच्या छायांकित प्रती सोबत जोडणे बंधनकारक आहे.

अर्जासोबतची नियमावली मी वाचली असून मला ती मान्य आहे. तसेच नियमावलीतील नियमांचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही याची मी हमी देतो.

उपरोक्त प्रमाणे भरण्यात आलेली सर्व माहिती खरी आहे कोणत्याही टप्प्यावर सदरची माहिती खोटी असल्याचे आढळल्यास व माझे दरपत्रक रद्द झाल्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाही. तरी माझे दरपत्रक स्वीकृत व्हावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

अर्जदाराची सही व पूर्ण नाव

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दरपत्रक शर्ती व अटी

शिवाजी विद्यापीठ परिसरातील **स्नॅक स्पॉट क.5 (नॅनो सायन्स अधिविभाग)** चालविण्यास देण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. या दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे राहतील.

1. विद्यापीठाने **स्नॅक स्पॉटच्या** इमारत तेथील आवश्यक ते फर्निचर, पाणी व्यवस्था यासह विनाशुल्क उपलब्ध करुन दिली जाईल. जागेचा फाळा (म्युनिसिपल टॅक्स) विद्यापीठ भरेल. **तथापी वीज वापराचे देयक कंत्राटदाराने आदा करावयाचे आहे.**
2. **स्नॅक स्पॉट** चालविण्यासाठीचे आवश्यक ते मनुष्यबळ व खाद्यपदार्थ बनविण्यासाठी आवश्यक ते साहित्य स्वखर्चाने उपलब्ध करावयाचे आहे.
3. कंत्राटदाराने **स्नॅक स्पॉटचे** आवश्यक ते सर्व परवाने स्वखर्चाने घ्यावयाचे आहेत.
4. विद्यापीठाने खाद्यपदार्थाचे प्रमाण व कमाल दर निश्चित केलेले आहेत. या दरानुसार साहित्य पुरविणे बंधनकारक राहील. उपरोक्त **स्नॅक स्पॉट** चालविण्यासाठी स्वामित्व शुल्क म्हणून कंत्राटदारांनी विद्यापीठास निश्चित केलेले मासिक मोबदला मुदतीत भरणे बंधनकारक आहे.
5. ज्या कंत्राटदाराची दरपत्रक मंजुर होईल त्यांना सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये करारपत्र करुन द्यावे लागेल.
6. एका कंत्राटदारास एकच **स्नॅक स्पॉट** चालविण्यास दिले जाईल.
7. **स्नॅक स्पॉटचे** दर सोबत जोडल्याप्रमाणे राहतील.
8. **स्नॅक स्पॉटच्या** बाबतीत कंत्राटदारास **उपाहारगृह/स्नॅक स्पॉट** चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसा लेखी पुरावा कंत्राटदाराने सादर करावयाचा आहे.
9. कंत्राटदाराने गेल्या तीन वर्षातील आयकर विवरणपत्रे व असेसमेंट ऑर्डर्सच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. महिला बचत गटाचे बाबतीत ही अट शिथील केली जाईल.
10. दरपत्रक अर्जाची सर्व कागदपत्रांसह पूर्तता करावी तसेच सर्व पानांवर अर्जदारांचा सही व शिक्का असणे आवश्यक आहे.
11. स्नॅक्स स्पॉट चालकांनी त्यांचा जमा होणारा ओला व सुका कचरा वेगवेगळया बकेटमध्ये साठावावा व दैंनदीन बायोगॅस प्लॅट पोहोच करणे बंधनकारक आहे.

12 दरपत्रक मंजूर झालेनंतर उपाहारगृह व स्नॅक्स स्पॉटचा ताबा देण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राहिल.

13. सदर दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक व दराची दरपत्रक) भरावयाची आहे सदर दोन लिफाफा पध्दतीत अंतर्भाव असलेल्या बाबी पुढीलप्रमाणे–

**लिफाफा क्र.1. तांत्रिक निविदेचा लिफाफा**

1. संस्था नोंद प्रमाणपत्र/अन्न व औषध विभागाकडील प्रमाणपत्र
2. उपाहारगृह/ स्नॅक स्पॉट चालविणेचा अनुभव असलेला दाखला.
3. संस्थचे/ठेकेदाराचे पॅन कार्ड
4. गत 3 वर्षातील आयकर विवरणपत्रे व ॲसेसमेंट ऑर्डरच्या झेरॉक्स प्रती. किंवा आयकर लागू नसल्यास तसे प्रमाणपत्र
5. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. (आवश्यक असल्यास)
6. आवश्यक माहीती भरुन स्वाक्षरी व शिक्क्यासह असलेला फॉर्म.
7. दरपत्रक अटी व शर्ती तसेच करारपत्राचा मसुदा व खाद्यपदार्थाचे दरपत्रक असलेले (जोडपत्र 'अ') सही व शिक्यानिशी जोडावे.
8. कोणत्याही प्रकारचा गुन्हां नोंद नसलेबाबतचा पोलिस स्टे  ानचा दाखला.

14 **लिफाफा क्र. 2. स्वामीत्व शुल्क नमूद दरपत्रकाचा लिफाफा**

1. स्वामीत्व शुल्क नमूद केलेली आणि स्वाक्षरी व शिक्क्यासह असलेली दराची प्रत (जोडपत्र 'ब')

आपला विश्वासू,

अर्जदाराची सही व पूर्ण नाव

D:\PBP\VRP\CANTIN\Tender 2025

जा.क्र. आस्थापना/ १७३३ दि.२१ऑगस्ट,२०२५

<u>जोडपत्र **'अ'**</u>

**शिवाजी विद्यापीठातील उपाहारगृह/स्नॅक स्पॉट मधील खाद्यपदार्थ व दरपत्रक**

| अ. क. | पदार्थाचे नाव | सुधारित दर | अ. क. | पदार्थाचे नाव | सुधारित दर |
|---|---|---|---|---|---|
| 01. | साधा फुल चहा 70 मिली | **08.00** | 02. | स्पे ाल फुल चहा 70 मिली | **12.00** |
| 03. | कॉफी 70 मिली | **12.00** | 04. | नेसकॉफी 70 मिली | **15.00** |
| 05. | दूध 100 मिली | **12.00** | 06. | लेमन टि / ब्लॅक टि | **10.00** |
| 07. | कांदापोहे 125 ग्रॅम | **15.00** | 08. | सामोसा 70 –80 ग्रॅम | **15.00** |
| 09 | स्पे. ि ारा 125 ग्रॅम | **20.00** | 10. | उपमा 125 ग्रॅम | **15.00** |
| 11. | बटाटेवडा पाव 100 ग्रॅम | **20.00** | 12. | भाबुवडा सिंगल 70–80 ग्रॅम | **15.00** |
| 13. | ढोकळा 70 ग्रॅम | **18.00** | 14. | भाबुखिचडी – चटणी / दही 125 ग्रॅम | **22.00** |
| 15. | सिंगल कटलेट 125 ग्रॅम | **20.00** | 16. | कांदा / बटाटा / मिरची भजी 4 नग | **25.00** |
| 17. | वडासांबार व 2 ब्रेड स्लाईस | **28.00** | 18. | व्हेज सॅडवीच | **25.00** |
| 19. | दोन इडली चटणी सांबार वजन 125 ग्रॅम | **25.00** | 20. | व्हेज बटर सॅडवीच | **30.00** |
| 21. | मिसळ पाव –2 ब्रेड स्लाईस | **30.00** | 22. | दोन उडीद वडा चटणी सांबार 125 ग्रॅम | **30.00** |
| 23. | मसाला डोसा | **35.00** | 24. | सिंगल अंडाआम्लेट व ब्रेड स्लाईस | **20.00** |
| 25. | ओनियन उत्ताप्पा | **35.00** | 26. | डबल अंडाआम्लेट व ब्रेड स्लाईस | **30.00** |
| 27. | टोमॅटो आम्लेट | **35.00** | 28. | पुरी भाजी – 4 पुरी, कांदा व लिंबू | **35.00** |
| 29. | कुर्मा पुरी – 4 पुरी | **35.00** | 30. | पावभाजी 125 ग्रॅम | **35.00** |
| 31. | दही वडा (डबल) प्रति प्लेट | **35.00** | 32. | आलू पराटा (एक वाटी दही व लोंणचे) | **30.00** |
| 33. | दोन चपाती, 1 वाटी भाजी, लोणच, कांदा व लिंबू | **40.00** | 34. | व्हेज पुलाव, लोणच, कांदा व लिंबू (300ग्रॅम) | **40.00** |
| 35. | लिंबू सरबत, कोकम सरबत, ताक, लस्सी, वेफर्स व आईस्क्रिम | | | कंपनी पॅकींग MRP दराने विक्री करणे | |

**शाकाहारी जेवण दरपत्रक**

| अ.क. | पदार्थाचे नाव | सुधारित दर |
|---|---|---|
| 01. | **शाकाहारी मिनी थाळी** – 2 चपाती, 1 भाजी, आमटी / वरण, प्लेन राईस, कोशिंबीर, लोणचे / लिंबू | **70.00** |
| 02. | **शाकाहारी थाळी स्वीट सहित** – भाकरी / चपाती / पुरी, 2 भाजी, (महाराष्ट्रीय / पंजाबी) आमटी / डालफ्राय, जीरा भात / मसाले भात, पापड, दही / कोशिंबीर, लोणचे / लिंबू व स्वीट 1 वाटी – (श्रीखंड / आम्रखंड / गुलाबजाम / जिलेबी विविध खिर यापैकी एक.) | **130.00** |
| 03. | **स्पेशल शाकाहारी थाळी स्वीट सहित**– भाकरी / चपाती / पुरी, 2 भाजी, (महाराष्ट्रीय / पंजाबी), आमटी / डालफ्राय, जीरा भात / मसाले भात / बिर्याणी राईस, कटलेट / भजी, पापड, दही / कोशिंबीर, लोणचे, लिंबू व स्वीट 1 वाटी – (बासुंदी / रसमलाई / रबडी / ाही तुकडा / बंगाली स्विट)यापैकी एक.) | **150.00** |

**मांसाहारी जेवण दरपत्रक**

| अ.क. | पदार्थाचे नाव | सुधारित दर |
|---|---|---|
| 01. | **अंडाकरी / अंडा मसाला थाळी** – 3, चपाती / 2, भाकरी, 2 बॉईल अंडी, अंडाकरी / मसाला, जिरा / मसाले भात, दहीकांदा व लिंबू . | **100.00** |
| 02. | **चिकन थाळी** – 3,चपाती / 2, भाकरी, 1 प्लेट चिकन मसाला / फ्राय (प्लेट मध्ये किंमान लहान 5 किंवा मोठे 4 पीस ), अंडा मसाला, तांबडा–पांढरा रस्सा, मसाले भात, दहीकांदा व लिंबू | **150.00** |
| 03. | **मटण थाळी** – 3, चपाती / 2, भाकरी, 1 प्लेट मटण मसाला / फ्राय ( प्लेट मध्ये किंमान लहान 5 किंवा मोठे 4 पीस ), अंडा मसाला, तांबडा–पांढरा रस्सा, मसाले भात, दहीकांदा व लिंबू . | **250.00** |

**सूप व स्टार्टर**

| अ.क. | पदार्थाचे नाव | सुधारित दर |
|---|---|---|
| 01. | **शाकाहारी सूप** – टोमॅटो / व्हेज मंचाव / व्हेज स्विट कॉर्न सूप इ. या पैकी एक (किमान 100 मिली) | **25.00** |
| 02. | **शाकाहारी स्टार्टर** – पनिर चिली / चिज बॉल / स्प्रिंगरोल / व्हेज नगेट / गोबी मंचुरियन इ. या पैकी एक (किमान 125 ग्रॅम) | **40.00** |
| 03. | **मांसाहारी सूप** – चिकन मंचाव, चिकन स्विट कॉर्न, चिकन हॉट अॅण्ड सॉर / चिकन क्लिअर सूप इ. या पैकी एक (किमान 100 मिली ) | **30.00** |
| 04. | **मांसाहारी स्टार्टर** – चिकन चिल्ली / चिकन लॉली पॉप / चिकन 65 इ. (किमान 125 ग्रॅम) | **50.00** |
| ❖ **कार्यालयीन कार्यकमास पूर्व मान्यतेने निश्चित करणे** | | |

**सूचना -** १) सर्व उपाहारगृह/स्नॅक्स स्पॉट चालकांनी सदर दरपत्रकानुसारच खाद्य पदार्थ विक्री करणे आवश्यक आहे.

२) उपरोक्त दरपत्रकाव्यतीरिक्त इतर खाद्य पदार्थ विक्रीस ठेवावयाचे असल्यास प्रथम प्रशासकीय मान्यता व दर निश्चित करुन घेणे आवश्यक आहे.

३) कागदी कप / प्लेटसाठी वेगळे दर आकारता येणार नाहीत.

# जोडपत्र – 'ब'

**स्नॅक स्पॉट क्र. 5 (नॅनो सायन्स अधिविभाग) चालविणेसाठी**
**मासिक स्वामीत्व शुल्क दरपत्रक**

कंत्राटदाराकडून विद्यापीठास दिल्या जाणा–या मासिक स्वामीत्व शुल्क ची रक्कम. (Mention Monthly Licensee fee)

| अ. क्र. | उपाहारगृह/ स्नॅक स्पॉट क्रमांक | किमान मासिक लायन्सेस फी रू. | मासिक रक्कम रुपये ( Monthly Licensee fee ) |
|---|---|---|---|
| 1 | स्नॅक स्पॉट क्र. 5<br>(नॅनो सायन्स अधिविभाग) | रू.१५,०००/–<br>+ जी.एस.टी. | रू................../–<br>+ जी.एस.टी. |

अर्जदाराची सही व पूर्ण नाव

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## शिवाजी विद्यापीठामधील उपाहारगृह व स्नॅक्स स्पॉट साठी
## लिव्ह अॅन्ड लायसेन्स करारनामा

हे लिव्ह ऑण्ड लायसेन्स करारपत्र आज दि. .... माहे ....... २०२५ रोजी कोल्हापूर मुक्कामी शिवाजी विद्यापीठ तर्फे अधिकृत अधिकारी

१. श्री.......... , वय– .....वर्षे, व्यवसाय.............राहणार.................

लायसेन्सॉर

आणि

१. श्री. .........., वय – .....वर्षे, व्यवसाय............ रहाणार................

लायसेन्सी

ज्या अर्थी लायसेन्सॉर शिवाजी विद्यापीठातर्फे कुलसचिव मुख्य प्रशासकीय अधिकारी आहेत आणि सदर मिळकतीचा पूर्णपणे ताबा आणि कब्जा शिवाजी विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेचा आहे. सदर मिळकत सि टी एस. नं........मधील याचे एकूण क्षेत्रफळ .......................... चौ. फूट ही मिळकत अधिक विस्तृतपणे परिशिष्ठामध्ये वर्णन केलेली आहे.

पूर्व

पश्चिम

उत्तर

दक्षिण

येणेप्रमाणे वर वर्णन केलेली मिळकत (यापुढे याचा उल्लेख 'सदर मिळकत' असा केला आहे.) ही शिवाजी विद्यापीठ यांच्या मालकीची आहे. तसेच लायसेन्सॉर यांना सदरील मिळकत विद्यापीठाचे उद्‌दिष्ट साध्य करण्याकरिता विद्यार्थी व इतर घटकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्याच्या प्रयोजनार्थ **उपहारगृह/स्नॅक्स स्पॉट** व्यावसायिक वापरासाठी लिव्ह अॅड लायसेन्स तत्वावर काही अटींवर देण्याची होती. लायसेन्सी यांना याबाबत जाहिरात निविदा प्रक्रियेद्वारे माहिती प्राप्त होताच रितसर निविदा प्रक्रियेद्वारे व निविदेमधील शर्ती व अटी मान्य असलेने सदरील मिळकत लायसेन्सी यांना लिव्ह अॅन्ड लायसेन्स तत्वावर देण्यास मान्यता मिळाली असलेने खालीलप्रमाणे लिव्ह ऑण्ड लायसेन्सच्या अटी व शर्ती दोन्ही पक्षांच्या साक्षीने व संमतीने खालीलप्रमाणे मान्य केल्या आहेत.

या करारामध्ये नमूद अटी व शर्तींचा विचार करून व लक्षात घेवून लायसेन्सॉरने सदर मिळकत लायसेन्सीला एक वर्ष कालावधीसाठी दिलेल्या उद्‌दिष्टीत व्यवसायाकरिता वापरण्याची परवानगी दि. ......... पासून दि............. पर्यंत दिलेली आहे.

१. उपरोक्त मिळकतीमध्ये नमूद व्यवसाय करणेकरिता लायसेन्सी यांनी **निविदा मंजूर झालेल्या दराने तीन महिन्याचे स्वामित्व शुल्क** अनामत रक्कम म्हणून रू. ....../– व विद्युत व पाणी बिलापोटी रू.१०,०००/– अनामत रक्कम चेक दि. ../../... द्वारे भरली आहे. सदर अनामत रक्कम लायसेन्सॉर लायसेन्सीस सदर मिळकतीचा सुस्थितीत ताबा परत केलेनंतर बिनव्याजी परत करणेची आहे.
२. सदर मिळकतीसाठी निश्चित झालेल्या व्यवसायाव्यतिरिक्त अन्य कोणताही व्यवसाय सदर मिळकतीमध्ये करता येणार नाही. ज्या कारणाकरिता सदर मिळकतीचा वापर करणेकरिता दिला आहे तो त्याच कारणाकरिता वापर करणेचा आहे.
३. लायसेन्सीने सदर मिळकत वापराबाबतची लायसेन्सॉरला लायसेन्स फी/मोबदला दरमहा रु. ............ देण्याचे मान्य केले आहे. त्यासाठीची आगाऊ रक्कम चेक/कॅशने इंग्रजी कॅलेंडरप्रमाणे महिन्याच्या पहिल्या पाच दिवसांचे आत देणेचे आहे. सदर लायसेन्स फी/मोबदला प्रस्तुत मिळकतीवरील वीज व पाणी देयके वगळून आकारलेला असेल.

४. लायसेन्सॉर यांनी लायसेन्स फी, वीज व पाणी देयके यामधील कोणतेही देयके थकबाकी ठेवणेचे नाही. उपरोक्त देयके नियमित न भरलेस आकारलेले देयके, दंड तसेच वीज व पाणी देयकांबाबत त्याचा पुरवठा खंडण करणे याबाबतची कारवाई करणेस लायसेन्सॉर यांना अधिकार असेल. लायसेन्सॉर यांचेकडे लायसेन्सी यांनी देय असलेले सर्व देयके नियमित व विहित वेळेत भरणे ही लायसेन्सी यांची जबाबदारी आहे, त्यामध्ये लायसेन्सी यांनी कसूर केल्यास अनामत रक्कम जप्त करण्याचा अधिकार लायसेन्सॉर यांना राहील.

५. लायसेन्सी यांनी दर फलक सदर मिळकतीमधील दर्शनी भागामध्ये लावणे बंधनकारक राहिल. दर फलकावरील दर ऑईल पेंट रंगामध्ये लिहिलेले असणे आवश्यक आहे. विहित केलेल्या दरापेक्षा जास्त दराने आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास सदर मिळकतधारकाने करारभंग केल्याचे समजून पुढील कारवाई केली जाईल.

६. पदार्थ, पदार्थाचे प्रमाण, दर व दर्जा विद्यापीठाने मान्य केलेले पदार्थ दर, प्रमाण व दर्जा याप्रमाणे पुरविले पाहिजेत. यामध्ये विद्यापीठाच्या पूर्वपरवानगीशिवाय बदल केलेले आढळल्यास करार रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील. तसेच अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार आवश्यक ती सर्व उपाययोजना कंत्राटदाराने करण्याची आहे.

७. लायसेन्सी यांनी ते चालवत असलेले उपाहारगृह/स्नॅक्स स्पॉटची इमारत व त्या सभोवताळचा परिसर स्वच्छ ठेवावयाचा आहे.

८. सदर मिळकतीमध्ये कोणत्याही बेकायदेशीर वस्तू/पेये यांची विशेषत: अंमली पदार्थ/पेये, तंबाखूजन्य पदार्थ, तसेच, जंक फूड व कार्बोनेटेड ड्रिंक्स यांची साठवणूक अथवा विक्री करता येणार नाही. तसेच, शासन, विद्यापीठ अनुदान आयोग व विद्यापीठाच्या निर्देशानुसार वेळोवेळी प्रतिबंध केलेले पदार्थ विक्री अथवा साठवणूक करता येणार नाही. याबाबत लायसेन्सी यांचेकडून गैरकृत्य, मालप्रॅक्टीस झाल्यास लायसेन्सॉर यांचेकडून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या ठरावानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९. सदर मिळकतीवर भाडेतत्व करार, इतर करार अथवा इतर अधिकार आणि हक्क निर्माण होतील असा कोणताही अर्थ या करारामध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कलमातून निर्माण होणार नाही.

१०. सदर मिळकतीवर नमूद कालावधीपर्यंतचा कब्जा लायसेन्सी यांचेकडे असला तरी लायसेन्सॉर यांचे सदर मिळकतीवर पूर्ण नियंत्रण व सदर जागेची पाहणी करण्याचा अधिकार राहील. तथापि सदर मिळकतीचा कायदेशीर ताबा फक्त लायसेन्सॉरलाच असेल.

११. या कराराचा हेतू लायसेन्सी यांना तात्पुरत्या तरतूदीप्रमाणे फक्त उद्दिष्टीत केलेल्या व्यावसायिक वापरासाठी आहे. इतर कोणत्याही कारणास्तव या मिळकतीचा वापर होणार नाही याची दक्षता लायसेन्सी यांनी घेणेची आहे.

१२. लायसेन्सी व त्यांचेकडे कर्मचारी असल्यास त्यांची वैद्यकीय तपासणी विद्यापीठाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून घेवून व त्यांची फी लायसेन्सी यांनी अदा करण्याची जबाबदारी ही लायसेन्सीवर आहे. वैद्यकीय तपासणीनुसार योग्य ती कार्यवाही करण्याची आहे.

१३. लायसेन्सी यांच्या कोणत्याही कृतीने सदर मिळकत अथवा शेजारील अन्य विभागांना कोणताही अडथळा, गैरसोय व अडवणूक होणार नाही याची दक्षता लायसेन्सी यांनी घेणेची आहे.

१४. लायसेन्सीने इतर कोणताही व्यक्ती/पक्ष यांना सदर कराराचा फायदा करून देणेचा नाही. या करारातील लायसेन्सी यांना त्यांचे हक्क हस्तांतर करता येणार नाहीत. तसेच सदर मिळकत किंवा त्यांचा कोणताही भाग पोट भाडेकरू म्हणून किंवा इतर तरतूदींद्वारे इतर कोणासही देता येणार नाही. लायसेन्सीने सदर मिळकतीमध्ये पोटभाडयाने तारण, हस्तांतरण, किंवा इतर कोणत्याही प्रकारचे देणे, असा लायसेन्सॉरचा मालकी हक्क व अधिकारांना बाधा येईल असा कोणत्याही स्वरुपाचा बोजा निर्माण करू नये.

१५. लायसेन्सीने सदर मिळकत व मिळकतीतील दारे खिडक्या, पाणीपुरवठा करणारे कनेक्शन यास कोणतेही नुकसान, धोका, अडथळा होणार नाही, अशा चांगल्या, स्वच्छ, समर्थनीय परिस्थितीत ठेवणेची आहे.

१६. सदर मिळकतीच्या इमारतीवर, फर्निचर व इतर सामानावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही. मिळकतीमध्ये असलेले लायसेन्सॉर यांचे सामान सुस्थितीत ठेवणेची जबाबदारी लायसेन्सी यांची आहे. सदर मिळकतीमध्ये लायसेन्सी यांना कोणत्याही प्रकारच्या जाहिराती लावता येणार नाहीत. लायसेन्सी यांना सदर मिळकतीचा कुटुंबासाठी किंवा स्वत:साठी निवासस्थान म्हणून वापर करता येणार नाही.

१७. उद्दिष्टीत व्यवसायाकरिता लागू असणारे सर्व कायदे, नियम पाळण्याची जबाबदारी लायसेन्सॉर यांची असेल. लायसेन्सी यांनी नेमलेले कामगार यांचा लायसेन्सॉर यांचेशी कोणताही संबंध असणार नाही.

१८. सदर मिळकतीमध्ये लायसेन्सी पुरवित असलेली सेवा अथवा उद्दिष्टीत व्यवसाय हा लायसेन्सॉर शिवाजी विद्यापीठ या शैक्षणिक संस्थेच्या परिसरातील निवासी व विद्यार्थ्यांच्या हिताकरिता व त्यांच्या सोयीकरिता असलेची जाणीव लायसेन्सी यांनी ठेवणेची आहे.

१९. कार्यालयीन सुट्टीदिवशी व कार्यालयाने पूर्वसूचना दिलेल्या दिवशी लायसेन्सी यांनी सदर व्यवसाय सुरू ठेवणे आवश्यक आहे.

२०. लायसेन्सीने ताबा घेतलेपासून सदर मिळकतीमध्ये होणाऱ्या सर्व मोठया आणि महत्वाच्या दुरुस्तीस आणि लायसेन्स कालावधीत त्यास होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस जबाबदार राहील.

२१. दोन्ही पक्षांमध्ये हे मान्य व कबूल आहे की, सदर करारानुसार लायसेन्सी फक्त करार कालावधीसाठीच लायसेन्सी म्हणून राहू शकतो आणि लायसेन्सी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही स्वरुपाचा कुळ हक्क, अधिकार असणार नाही.

२२. लायसेन्सी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारच्या धोकादायक, हानीकारक, ज्वालाग्रही वस्तू साठवू अगर बाळगू शकत नाही.

२३. लायसेन्सीने सदरील मिळकतीचा वापर कोणत्याही बेकायदेशीर अवैध, अनैतिक, अयोग्य कारणांसाठी करता येणार नाही. तसेच इतर शेजारी यांना कोणत्याही प्रकारचा उपद्रव अथवा अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

२४. कराराची मुदत २ वर्षे राहिल आणि या १ वर्षातील सेवासमाधानकारक वाटल्यास पुढील १ वर्षासाठी मुदतवाढ देण्याचा विचार केला जाईल.

२५. कराराची नमूद कालावधी सुरु असताना कोणत्याही वेळी सदर करार लायसेन्सीला ३० दिवसांची लिखित नोटीस बजावून रद्द करण्याचा हक्क लायसेन्सॉरला आहे.

जर लायसेन्सीने पुढीलपैकी कोणताही तरतुदीचा भंग केला असेल,

१. सलग दोन महिने लायसेन्स फी देण्यात चूक, किंवा कसूर .

२. वीज अथवा अन्य देयके विहित वेळेत न भरल्यास.

३. निविदा व प्रस्तुत करारातील अटी व शर्ती यांचा भंग केल्यास,

लायसेन्सीस ३० दिवसांची लिखित नोटीस देईल अशा परिस्थितीत लायसेन्सॉरला लायसेन्सी यास सदरील मिळकतीतून काढून टाकणेचा अथवा तशी ठोस कारवाई करण्यास हक्क आहे. मुदतीपूर्वीच्या करार रदद् करण्याच्या लायसेन्सॉर यांच्या निर्णयाला लायसेन्सी हा बांधील राहील. लायसेन्सी यांस सदरच्या निर्णयाविरुध्द् कोणतीही हरकत घेता येणार नाही.

२६. काही कारणास्तव लायसेन्सी यांना सदरचा करार संपुष्टात आणावयाचा झाल्यास ९० दिवस आधी लायसेन्सॉर यांना तसे लेखी कळविणे आवश्यक.

२७. जर दोन्ही पक्षांनी त्यांचे कराराचे पुनर्निमाण/नुतनीकरण केले नसेल तर सदर लिव्ह ॲन्ड लायसेन्स करार नमूद महिन्यांचा कालावधी संपलेवर आपोआपच संपुष्टात येईल. करार संपुष्टात आल्यानंतर २४ तासाच्या आत लायसेन्सॉर यांचेकडे सदर मिळकतीचा ताबा सोपविणेचा आहे.

२८.या करारनाम्यातील अटींचा लायसेन्सी यांनी भंग केल्यास लायसेन्सॉर हे लायसेन्सी यांना १ महिन्यांची आगाऊ नोटीस देऊन सदर करारनामा रदद् करु शकतील व सदरील मिळकतीचा सत्वर ताबा लायसेन्सी यांचेकडून घेण्याची कार्यवाही करू शकतील.

२९.सदर मिळकतीत लायसेन्सी करणार असलेल्या व्यवसायाकरिता आवश्यक ते परवाने लायसेन्सी यांनी संबंधित कार्यालयातून स्वखर्चाने घेणेचे आहेत.

३०.सदर मिळकतीमधील लायसेन्सी यांचे साहित्य, माल व त्यांचे कर्मचारी यांचा विमा लायसेन्सी यांनी स्वखर्चाने काढणेचा आहे. तसेच सदर मिळकतीचा ताबा घेतलेपासून तो सोडेपर्यंत त्याची व त्यातील साहित्याची जबाबदारी सर्वस्वी लायसेन्सी यांची राहिल.

३१. प्रस्तुत करारपत्रास आवश्यक असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, नोंदणीचा पूर्ण खर्च यातील लायसेन्सी याने करणेचा आहे.

३२.कार्यालयीन शिक्षक व प्रशासकीय कर्मचा—यांसाठी स्वंतत्र व्यवस्था असणे आवश्यक आहे.

३३.विद्यापीठाशी संबधित नसलेल्या व्यक्ती/संस्था यांचे कार्यक्रम/समारंभासाठी उपाहारगृह/स्नॅक्स स्पॉट उपलब्ध करून देता येणार नाही. तसेच बाहेरील कोणत्याही प्रकारच्या कार्यक्रम/समारंभाच्या ऑर्डर्स स्विकारता येणार नाहीत.

निविदा प्रक्रियामधील अटी व शर्ती या कराराचा भाग आहेत.

स्थळ

दिनांक

लायसेन्सॉर

(श्री…………………………….)

लायसेन्सी

(श्री……………………………….)

साक्षीदार
१)……………
२)……………